## निशाणी क्र.५ खालील आदेश.

( देवानंद व इतर वि. अकोला जिल्हा व इतर )

१) वादी यांनी निशाणी क्र.५ अन्वये अंतरिम मनाई हुकूमाचा अर्ज दाखल करून प्रतिवादी क्र.२ यांनी दिनांक १९/०७/२०२६ रोजी आयोजित केलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेस स्थगिती देण्याची, तसेच प्रतिवादींना कोणताही अंतिम निर्णय अथवा ठराव घेण्यापासून प्रतिबंध करण्याची विनंती केली आहे.

२) निशाणी क्र.५ वरील अर्जावर प्रतिवादी क्र.१ व २ यांनी हजर राहून आपले म्हणणे निशाणी क्र.१४ अन्वये दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.३ हे गैरहजर आहेत. दोन्ही पक्षांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. अर्जासोबत दाखल कागदपत्रे, प्रतिवादींचे म्हणणे तसेच उपलब्ध अभिलेख यांचे अवलोकन केले.

३) वादी यांचा मुख्य दावा असा आहे की, ते संस्थेचे निवडून आलेले संचालक होते. त्यांनी दिनांक १०/०५/२०२६ रोजी संचालकपदाचा राजीनामा दिला. त्यापूर्वी काही संचालक अपात्र ठरल्याने अथवा त्यांनी पदाचा राजीनामा दिल्याने संचालक मंडळाची गणपूर्ती (**Quorum**) शिल्लक राहिलेली नाही. परिणामी उर्वरित संचालकांना वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविण्याचा अथवा तिचे आयोजन करण्याचा अधिकार राहिलेला नाही. तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७५, कलम ७७ तसेच संस्थेच्या उपविधींचे उल्लंघन करून सभा आयोजित करण्यात येत असल्याचे वादींचे म्हणणे आहे.

४) प्रतिवादींनी अर्जास विरोध करून असे प्रतिपादन केले की, प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादी क्र. १ ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांतर्गत

18/07/26.

नोंदणीकृत सहकारी पतसंस्था असून तिचे कार्य संस्थेच्या उपविधी व कायद्यानुसार सुरू आहे. प्रतिवादी क्र. २ हे सध्या कार्यकारी अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

५) वादी हे संस्थेचे सभासद व संचालक असून १०/०१/२०२२ रोजी झालेल्या निवडणुकीत १३ संचालक निवडून आले होते. त्यापैकी काही संचालक अपात्र ठरल्यानंतर त्यांच्या जागी संस्थेच्या उपविधीनुसार ठराव करून नवीन संचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच एका अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील संचालकाच्या सेवानिवृत्तीनंतर त्याच्या जागी संबंधित प्रवर्गातील पात्र उमेदवाराची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांना कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने स्थगिती दिलेली नाही.

६) वादींनी दिलेले राजीनामे अद्याप संस्थेने स्वीकारलेले नसल्यामुळे ते कायदेशीरदृष्ट्या अद्याप संचालकच आहेत व त्यांच्या जागा रिक्त झालेल्या नाहीत. त्यामुळे व्यवस्थापन समिती पूर्ण क्षमतेने व आवश्यक गणपूर्तीसह (Quorum) कार्यरत आहे. वादींनी व्यवस्थापन समितीमध्ये रिक्त जागा आहेत, गणपूर्ती नाही किंवा वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यास अधिकार नाही, असे केलेले सर्व आरोप चुकीचे, दिशाभूल करणारे व वस्तुस्थितीविरुद्ध असल्याचे प्रतिवादींचे म्हणणे आहे. वादींनी महत्त्वाची तथ्ये लपवून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १९/०७/२०२६ रोजी घेणे ही कायदेशीर व वैधानिक जबाबदारी असून, सभा घेण्यास कोणताही कायदेशीर अडथळा नाही. सभा रोखल्यास संस्थेचे प्रशासन व सभासदांचे हित बाधित होईल.

७) दोन्ही पक्षांच्या युक्तिवादाचा विचार करता, अंतरिम मनाई हुकूम देताना न्यायालयाने प्रथमदर्शनी हक्क (Prima Facie Case), सोयीची बाजू (Balance of

18/07/26.

Convenience) आणि अपूरणीय नुकसान (Irreparable Injury) या त्रिसूत्रीचा विचार करणे आवश्यक आहे.

८) दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि सादर केलेले मुद्दे विचारात घेता, निर्णयासाठी खालील विचाराधीन मुद्दे उपस्थित झाले आणि त्यावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवले आहेत :-

| अनुक्रमांक | विचाराधीन मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादकर्त्यांने 'प्रथमदर्शनी केस' (prima-facie case) सिद्ध केली आहे का? | ...होकारार्थी... |
| २ | वादकर्त्यांने हे सिद्ध केले आहे का की 'सुविधेचा समतोल' (balance of convenience) त्याच्या बाजूने आहे? | ...होकारार्थी... |
| ३ | वादकर्त्यांने हे सिद्ध केले आहे का की, मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता दिलासा न मिळाल्यास त्याचे 'अपरिवर्तनीय नुकसान (irreparable loss) होईल? | ...होकारार्थी... |
| ४ | काय आदेश? | ..... अर्ज अंशत: मंजूर करण्यात आला आहे. |

:: कारणमिमांसा ::

९) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत (यादी नि.क्र.४/१),

18/07/26

वर्तमानपत्रातील वार्षिक साधारण सभेची नोटीस (यादी नि.क्र.४/२), नोटीस (यादी नि.क्र.४/३), नोटीस (यादी नि.क्र.४/४), आदेशाची प्रत (यादी नि.क्र.४/५), परिशिष्ट–ब (यादी नि.क्र.४/६), आदेशाची प्रत (यादी नि.क्र.४/७), आदेशाची प्रत (यादी नि.क्र.४/८), अर्ज (यादी नि.क्र.४/९), नोटीस (यादी नि.क्र.४/१०), राजीनामा पत्र (यादी नि.क्र.४/११, ४/१२, ४/१३ व ४/१४), डीडीआर (DDR) कार्यालय व सोसायटीकडे केलेला अर्ज (यादी नि.क्र.४/१५), डीडीआर (DDR) कार्यालयाकडे केलेला अर्ज (यादी नि.क्र.४/१६ व ४/१७), अर्ज (यादी नि.क्र.४/१८ व ४/१९), संस्थेची उपविधी (यादी नि.क्र.४/२०), आदेशाची प्रत (यादी नि.क्र.४/२१ व ४/२२), मा. उच्च न्यायालयातील कार्यवाहीचा अभिलेख (यादी नि.क्र.४/२३) व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत (यादी नि.क्र.४/२४ व ४/२५) इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहेत.

१०) याउलट प्रतिवादींनी ठराव (यादी नि.क्र.१७/१), उप–जिल्हा निबंधकांना (D.D.R.) पत्र (यादी नि.क्र.१७/२), आदेश (यादी नि.क्र.१७/३), आदेश (यादी नि.क्र.१७/४), ठराव (यादी नि.क्र.१७/५), उप–जिल्हा निबंधकांना (D.D.R.) पत्र (यादी नि.क्र.१७/६), नियुक्ती पत्र (यादी नि.क्र.१७/७), ठराव (यादी नि.क्र.१७/८), उप–जिल्हा निबंधकांना (D.D.R.) पत्र (यादी नि.क्र.१७/९), नियुक्ती पत्र (यादी नि.क्र.१७/१०), नोटीस (यादी नि.क्र.१७/११), उप–जिल्हा निबंधकांचे (D.D.R.) पत्र (यादी नि.क्र.१७/१२) व संस्थेचे उपविधी (यादी नि.क्र.१७/१३) इत्यादी दस्त अभिलेखावर दाखल केले.

<u>मुद्दे क्र.१ ते ३ च्या अनुषंगाने</u> :–

११) उपरोक्त मुद्दे हे एकमेकांशी संगनमत असल्याने त्याचा उहापोह एकत्रितरित्या करण्यात येत आहे. सदर प्रकरणात वादी यांनी संचालक मंडळाची गणपूर्ती

18/07/26.

नसल्याचा, तसेच सभा घेण्याचा अधिकार नसल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. दुसरीकडे, प्रतिवादींनी हे सर्व मुद्दे ठामपणे नाकारले आहेत. संचालकांचे राजीनामे कायदेशीररीत्या प्रभावी झाले आहेत काय?, संचालक मंडळाची वैध रचना अस्तित्वात होती काय?, गणपूर्ती होती काय?, वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविण्याचा अधिकार कोणाकडे होता?, तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व उपविधींचे उल्लंघन झाले आहे काय?, हे सर्व प्रश्न पुरावा व सविस्तर सुनावणीअंतीच निश्चित करता येतील. या टप्प्यावर त्याबाबत अंतिम निष्कर्ष नोंदविणे योग्य ठरणार नाही.

१२) प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने वादींची याचिकेमध्ये प्रस्तुत प्रतिवादी संस्थेची गणपुर्ती अस्तित्वात आहे. त्यामुळे सदरची बाब ही प्रस्तुत न्यायालयावर बंधनकारक आहे व त्यामुळे, दिनांक १९/०७/२०२६ रोजी होणारी वार्षिक सभा करणे न्यायोचित होईल. त्यासाठी मला विशेषत: येथे हे नमुद करावेसे वाटते की,

> *"एकदा का एखादी मुख्य याचिका किंवा मुख्य वाद मा. उच्च न्यायालयामार्फत फेटाळला गेला की, तो प्रलंबित असतांना मा. उच्च न्यायालयाने पारित केलेले सर्व अंतरिम आदेश अंतिम आदेशात विलीन होतात. त्यांचे स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व संपुष्टात येते".*

विशेष म्हणजे प्रस्तुत प्रकरणात उपविधीप्रमाणे संस्थेची वार्षिक सभा घेण्याकरिता जिल्हा निबंधक यांच्या विशेष आदेशाची आवश्यकता असते, परंतु तशा आदेशाची प्रत प्रतिवादींनी अभिलेखावर दाखल केली नाही. याउलट, प्रतिवादींनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांचा आजरोजीचा आदेश (यादी नि.क्र.१७/१२) अभिलेखावर दाखल केला. सदरच्या आदेशाचे गांभिर्याने अवलोकन केले असता,

18/07/26.

सदरचा आदेश हा संस्थेची वार्षिक सभा घेण्यासाठी केलेला विशेष आदेश नाही. त्यामुळे, त्या आदेशाला प्रथमदर्शनी ग्राह्य धरता येणार नाही.

१३) वादींनी *विजय लाखी व इतर विरुद्ध सहकार मंत्री व इतर* (०६/१०/२०२५) या निर्णयावर आपली भिस्त ठेवली आहे. सदरच्या निर्णयामध्ये

*"सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापन समितीतील ८ पैकी ४ सदस्यांनी राजीनामे दिल्यामुळे समितीचे गणपूर्ती (**Quorum**) संपुष्टात आली. जिल्हा उपनिबंधकांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 च्या कलम ७७अ अंतर्गत समिती बरखास्त करून अधिकृत अधिकारी नियुक्त केला. या आदेशाला अपील व पुनर्विलोकनात कायम ठेवण्यात आले. त्याविरुद्ध उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली. त्यात मा. उच्च न्यायालयाने असा आदेश जारी केला की,*

*"कलम ७७अ चा उद्देश सहकारी संस्थेचे कामकाज खंडित होऊ नये हा कलम ७७अ चा उद्देश आहे. शक्यतो संस्थेचे व्यवस्थापन संस्थेच्या स्वतःच्या सदस्यांकडेच राहावे. बाहेरील अधिकृत अधिकारी नेमणे हा शेवटचा (**last resort**) उपाय आहे. कलम ७७अ अंतर्गत टप्प्याटप्प्याने कारवाई प्रथम रिक्त जागा भरण्याचा प्रयत्न. त्यानंतर संस्थेतील सदस्यांची तात्पुरती समिती नियुक्त करणे. हे दोन्ही पर्याय शक्य नसतील तरच बाहेरील अधिकृत अधिकारी नेमावा. गणपूर्ती नसलेल्या समितीला अधिकार नाहीत बहुसंख्य सदस्यांनी राजीनामे दिल्यानंतर समिती गणपूर्तीखाली गेल्यास ती कायदेशीरदृष्ट्या कार्यक्षम राहत नाही. अशा समितीला बैठक घेणे, ठराव मंजूर करणे किंवा सहनियुक्ती (**co-option**) करण्याचा अधिकार राहत नाही. सर्वसाधारण सभेने समिती वाचवू शकत नाही. गणपूर्ती नसलेली समिती सर्वसाधारण सभेकडून मान्यता घेऊन स्वतःला वैध ठरवू शकत नाही. अशा*

18/07/26.

*परिस्थितीत कलम ७७अ मधील वैधानिक प्रक्रिया अवलंबणे बंधनकारक आहे."*

१४) तथापि, अभिलेखावरील कागदपत्रे व दोन्ही पक्षांच्या मांडणीवरून असे दिसून येते की, वादी यांनी उपस्थित केलेले मुद्दे प्रथमदर्शनी विचार करण्याजोगे व वादग्रस्त आहेत. जर प्रस्तावित वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन त्यामध्ये विविध ठराव मंजूर झाले व त्यांची अंमलबजावणी करण्यात आली, तर पुढे दावा यशस्वी झाल्यास निर्माण झालेली परिस्थिती पूर्ववत करणे अत्यंत कठीण होण्याची शक्यता आहे. त्यातून अनेक तृतीय पक्षांचे हक्क निर्माण होऊ शकतात, तसेच अनावश्यक न्यायालयीन गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता देखिल नाकारता येत नाही.

१५) याउलट, अल्पकालीन कालावधीसाठी यथास्थिती कायम ठेवून प्रतिवादींचे म्हणणे विचारात घेऊन अर्जाचा अंतिम निर्णय घेतल्यास प्रतिवादींना होणारी गैरसोय तुलनेने कमी आहे. त्यामुळे या टप्प्यावर सोयीची बाजू वादींच्या बाजूने झुकत असल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तावित सभा व त्यातील ठरावांची अंमलबजावणी झाल्यास वादींना होणारे नुकसान केवळ आर्थिक भरपाईने भरून निघणारे नाही. त्यामुळे, अपूरणीय नुकसानीची शक्यता देखील प्रथमदर्शनी दिसून येते.

१६) त्यामुळे उपलब्ध अभिलेख, दोन्ही पक्षांचा युक्तिवाद व अंतरिम दिलासा देण्यासंबंधीचे स्थापित न्यायतत्त्वे विचारात घेता, दाव्याच्या अंतिम गुणवत्तेबाबत कोणतेही मत व्यक्त न करता, अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत तात्पुरते संरक्षण देणे न्यायहिताचे व समन्यायी ठरेल, कारण तसे न केल्यास वादींचा दावा निरर्थक ठरेल. म्हणुन मी विचाराधीन मुद्दे क्र.१ ते ३ यांना होकारार्थी उत्तर दिले.

18/07/26

अ) विचाराधीन मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने :--

१७) वरिल चर्चा आणि प्रस्थापित कायदेशीर स्थिती लक्षात घेता, तात्पुरती मनाईहुकूम (temporary injunction) मंजूर करण्यासाठी वादकर्त्याने (Disputant) आपली बाजू सिद्ध केली आहे, अशी या न्यायालयाची प्रथमदर्शनी खात्री पटली आहे. त्यानुषंगाने, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :–

:: आदेश ::

१) वादीचा निशाणी क्र.५ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादींना पुढील आदेश होईपर्यंत दिनांक १९/०७/२०२६ रोजी प्रस्तावित वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यास व त्यामध्ये कोणताही अंतिम ठराव मंजूर करून त्याची अंमलबजावणी करण्यास तात्पुरती मनाई करण्यात येते.

३) हा आदेश केवळ अंतरिम स्वरूपाचा असून दाव्याच्या अंतिम गुणवत्तेबाबत कोणतेही मत व्यक्त करण्यात आलेले नाही.

(आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला)

18/07/26.

ठिकाण: अकोला.
दिनांक: १८/०७/२०२६

(व्हि.व्हि. जोशी)
न्यायाधिश,
सहकार न्यायालय, अकोला.